माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३०६२**

**अपिलार्थी श्री. दिनेश महेंद्र जाधव**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ (पश्चिम)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन,
कलानगर, वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
रुम नं.५३७ चौथा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०१.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०८.२०२४ | १६.०८.२०२४ | २९.०८.२०२४ | ३०.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ११.१०.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १६.०८.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०६.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, पश्चिम विभाग येथील उप अभियंता-१ यांच्या विभागाअंतर्गत येणाऱ्या १६७-विलेपार्ले, १७५-कलिना व १७७-बांद्रा (पश्चिम) विधानसभा मतदार संघ तसेच २९-मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदार संघातील असे सर्व आमदार, खासदार व प्रशासकीय निधीतून विविध योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाची माहिती मिळणेबाबत :-*

*(१) विविध योजने अंतर्गत एन.एस.डी.सी. डी.पी. डी.सी. एनबीए, बॉम्बे, संरक्षण भिंत सौंदर्याकरण नागरी दलित वस्ती सुधारणा व इतर कामाची अंदाजपत्रके, आराखडे कामाची गुणवत्ता तपासलेले पत्र, मोजमाप घेऊन देयक (बिल) पत्र मिळणेबाबत.*
*(२) विविध योजने अंतर्गत केलेल्या सर्व कामाची एम.बी. बुकाची प्रत मिळणेबाबत.*
*(३) संपूर्ण फाईलचे निरीक्षण मिळावे."*

..२/-

११

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपण मागितलेली माहिती १७५-कलिना, १६७- विलेपार्ले, १७७ बांद्रा (प.) तसेच २९- मुंबई उत्तर मध्य या विधानसभेतील आमदार निधीतील विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२, दि. १६.०१.२०१२ च्या अधिसुचनेप्रमाणे "अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज, एकाच विषयाशी संबंधित असावा. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयाची माहिती हवी असेल तर त्याकरीता स्वतंत्र अर्ज करणे अपेक्षित आहे. 'त्यास अनुसरून या कार्यालयातर्फे २०२१ ते दि. ०६.०८.२०२४ या कालावधीमध्ये झालेल्या कामांची प्रशासकीय मंजूरी आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या विभागातून मंजूर करण्यात येतात. सदर मंजूर कामे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या https://mumbaisuburban.gov.in/mr/ या वेबसाईटवर प्रसासकीय मान्यता (Administrative Approval) उपलब्ध आहे. या वेबसाईटवरुन कामांची माहिती आपणास उपलब्ध होईल. त्यातील ठराविक कामांची माहिती स्वतंत्र अर्जाद्वारे मागितल्यानंतर त्या कामांची माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००१/प्र.क्र. ३९८/०९/सहा, दि. ३१.०५.२०१२ मधील महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ च्या ३ क्र नुसार " अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधीत असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे दिडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरीता स्वतंत्र अर्ज करील. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ अंतर्गत प्रत्येक काम हा विषय असून प्रत्येक कामाची वेगळी नस्ती आहे. तरी आपण विशिष्ट कामाच्या नावासह अर्ज करावा.

अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थींनी दि. २९.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. १३.०१.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींनी विचारलेली माहिती फारच विस्तृत असल्याने तथा विविध नस्त्यांमध्ये विखुरलेली असल्याने दि.१६.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना आवश्यक असलेल्या विशिष्ट कामाच्या नावासह अर्ज करण्याची विनंती केली होती व त्यांनी अपिलार्थींना समक्ष मा. सर्वोच्च न्यायालय सिव्हील अपील क्र. ६४५४/२०११ दि. ०१.०८.२०११ रोजी दिलेले दिलेले निकालाबाबात समजावून सांगण्यात आले होते. तसेच, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक कमाअ २००१/प्र.क्र. ३९८/०१ सहा. दि. ३१.०५.२०१२ निदर्शनास आणले होते. अपिलार्थी यांनी विचारलेल्या माहितीमध्ये जवळपास २५०० कामांचा समावेश आहे.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१०.२०२४ रोजी अपिलकर्त्यांनी प्रशासकीय मंजूरीच्या कामांची यादी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या www.mumbaisuburban.gov.in या वेबसाईटवरुन प्राप्त करुन घ्यावी व त्यांना हवी असलेल्या कामांच्या माहिती बाबत काम निहाय स्वतंत्र अर्ज करावा व जनमाहिती अधिकारी यांनी सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास लवकरात लवकर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले होते.

त्यामुळे अपिलार्थीच्या विनंतीवरुन एका कामाची नस्ती दाखविण्यात आली व त्याची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. अपिलार्थी यांनी दि. ०९.१२.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांना लेखी पत्र दिले आहे की, त्यांना माहिती मिळालेली आहे व त्याने माझे पूर्ण समाधान झालेले आहे. तसेच माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात यावे. सदर पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर करुन नमुद करुन नमुद केले की, सदर पत्र अपिलार्थींनी त्यांच्या कार्यालयाच्या आवक शाखेत दिले होते.

५. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती मिळालेली नाही व त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती मिळालेली आहे असे कोणतेही पत्र दिलेले नाहीत.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदनासह सादर केलेले अपिलार्थीचे पत्रावर प्रथमदर्शनी स्वाक्षरी अपिलार्थीची असल्याची दिसून येते.

७. The commission would like to mention the Apex Court observations relating to impractical demands of the appellants in the case of CBSE vs Aditya Bandopadhyay & Ors on 9 August, 2011, Civil Appeal No.6454 of 2011 [Arising out of SLP [C] No. 7526/2009.

"37 .........Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down with the non-productive work of collecting and furnishing information. The Act should not be allowed to be misused or abused, to become a tool to obstruct the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty. The nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spends 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and the pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of a public authorities prioritising 'information furnishing', at the cost of their normal and regular duties.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील निकाल पाहता व अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात समाविष्ट २५०० कामांची माहिती लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम ७(९) अन्वये अपिलार्थींना अशी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.

९. या आयोगासमोर माहितीचा अधिकार अधिनियम चे कलम ४(१)(ख) अंतर्गत अशा प्रकारची माहिती प्रकाशित करण्याबाबत एक अन्य प्रकरण प्रलंबित आहे.

..४/-

१०. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १६.०१.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**